नियमित दिवाणी दावा क्र. १/२०१५
सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००००0३–२०१५

निशाणी क्र.३३६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, प्रतिवादी क्र.२ विनायक विष्णू पुजारे यांचे दि.०८/०८/२०२५ रोजी नाडण, ता.देवगड येथे निधन झाले आहे. त्यांचे प्रतिवादी क्र.२अ ते २ड हे वारस आहेत. सबब, सदर वारसांना याकामी सामील करुन त्याप्रमाणे दाव्याचे कामी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन योग्य तो आदेश करावा असे कळविले आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी ठराव व कायमस्वरुपी ताकीद याकरिता दाखल केलेला आहे.

४. सदर कामी **नि.क्र.३३९** येथे दाखल केलेले प्रतिवादी क्र.२ विनायक विष्णू पुजारे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मुदतीत दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, मयत प्रतिवादी क्र.२ यांच्या वारसांविरुध्द प्रस्तुत दावा पुढे चालवण्याचा अधिकार वादी यांना असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्तवाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

## – आदेश –

१. अर्ज नि.क्र.३३६ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.09.18 12:09:15 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड

दिनांकः १७/०९/२०२५